सप्टेंबर - २०२४ * अंक- ३ रा

# अजिंठा

## रोटरी क्लब जळगाव

क्लब क्र.15512 रो.डिस्ट्रीक्ट 3030 रोटरी वर्ष 2024-25





आर.आय.प्रेसिडेंट
**रो. स्टेफनी अर्चिक**



डिस्ट्रिक्ट गव्हर्नर
**रो. राजिंदरसिंग खुराना**



प्रेसिडेंट
**रो. ॲड. सागर चित्रे**




ऑन.सेक्रेटरी
**रो. पराग अग्रवाल**



बुले.कमिटी चेअरमन
**रो. स्वाती ढाके**

THE MAGIC OF ROTARY

ROTARY CLUB OF OJAI 75th Anniversary 1948 - 2023




BACHPAN
CLUB THEME 2024-25

## संपादकीय....

सर्व बंधू भगिनींना रोटरी प्रणाम!

सर्वप्रथम आय.पी.पी. मनोज जोशी व त्यांच्या टीमचे मनःपूर्वक अभिनंदन!

यावर्षी आपल्या क्लबला ५ अवॉर्ड मिळाले. त्यात आपल्या बुलेटिनला बेस्ट हिंदी/मराठी बुलेटिनचे पहिले अवॉर्ड मिळाले. सलग चार वर्षे झाले, आपण बेस्ट बुलेटीनचे अवॉर्ड घेत आहोत. मी सर्वांनी केलेल्या सहकार्याबद्दल मनापासून सर्वांचे आभार मानते.

विशेष म्हणजे अध्यक्ष रो. ॲड.सागर चित्रे व टीमचे अभिनंदन! कारण यावर्षी डिस्ट्रिक्ट अवॉर्ड फंक्शन चे नियोजन आपल्या क्लब कडे होते. अध्यक्ष व त्यांच्या टीमने ते यशस्वीपणे पार पाडले ,एवढेच नाही तर आपल्या क्लब वर डिस्ट्रिक्ट कडून कौतुकाचा वर्षाव झाला. या कार्यक्रमात लेडीज कमिटीचा ही सहभाग उल्लेखनीय होता. रो. ॲनेट अनस विंची यानेही अथक परिश्रम केले. तसेच रो. योगेश गांधींनी दिलेली फेलोशिप तर अवर्णनीय होती, एकूण काय तर सर्व क्लब मधील रोटेरियन्सनी सक्रीय सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी नाही तर आपल्या क्लबच्या प्रतिमेला उंचावणारा व शोभणारा असाच केला.

तसेच २७ वर्षांनंतर आपल्या क्लब मध्ये ध्वजारोहणाचा कार्यक्रम झाला. यावर्षी अतिशय उत्साहात प्रोजेक्ट होत आहेत. त्याची सविस्तर माहिती पान नंबर तीन–चार–पाच वर दिलेली आहे. सप्टेंबर हा 'प्राथमिक शिक्षण व साक्षरता' डेझिग्नेटेड मंथ आहे. त्यावर रो पी पी कॅप्टन मोहन कुलकर्णी यांचा सविस्तर लेख पान नंबर ७ आहे .रो. पास्ट प्रेसिडेंट डॉ. सुभाष चौधरी यांनाही श्रद्धांजलीपर लेख रो माजी अध्यक्ष प्रेम कोगटा यांनी लिहिलेला पान नंबर वर ८ आहे. सर्व क्लब तर्फे माजी अध्यक्ष रो.डॉ.सुभाष चौधरी यांना आदरपूर्वक श्रद्धांजली आणि त्यांच्या रोटरी कार्याला आणि समाजकार्याला त्रिवार वंदन

**– रो. स्वाती ढाके**

## अध्यक्षीय.....

रोटरी प्रणाम, मित्रांनो,

ऑगस्ट महीन्याची सुरुवात खुपच रंजक होती. या अमृत महोत्सवानिमित्त आपण सगळ्यांनी मिळून बरेच अविस्मरणीय क्षण अनुभवले आहेत. दि. ४ ऑगस्ट २०२४ रोजी आपल्या क्लब तर्फे डिस्ट्रीक्ट ॲवार्ड इव्हेंटचे आयोजन करण्यात आलेले होते. संपूर्ण कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी प्रत्येक सदयस्यांनी खुप मेहनत घेतली त्याची पावती म्हणजे हि की, संपुर्ण जिल्ह्याने केलेल्या नियोजना बाबत कौतुक केले. टीम वर्क काय असते हे आपण सगळ्यांनी मिळून दाखवून दिले. या महीन्यात आपल्या परिवारात काही सदस्य सहभागी झाले.एकुण १० नवीन सदस्यांनी आपल्या परिवारात सहभाग घेतला, त्यांचे आपल्या क्लब तर्फे स्वागत करतो. बऱ्याच वर्षानंतर आपण आपल्या क्लब मध्ये स्वतंत्र दिवस आपला राष्ट्रीय ध्वज फडकवुन साजरा केला. त्यासाठी आपले प्रमुख पाहुणे म्हणून एनसीसी ची टिम व रोटरी सारेगमा च्या टीमचे सहकार्य मिळाले त्या बाबत त्यांचे आभार व्यक्त करतो.

तसेच यावर्षी आपण आपल्या क्लबच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने व्याखानमालांची सिरीज सुरू केली त्यात आपण प्रख्यात मनोविकासतज्ञ श्री डॉ. आनंद नाडकर्णी यांचे व्याख्यान 'सुखी माणसाचा सदरा' आपल्या क्लब तर्फे आयोजीत केले. या महिन्यात आपले फॅमिली मिटींग कुकींग कल आज कल चे प्रमुख पाहुणे श्री.निखिल कांडलकर यांच्या शैली मुळे यशस्वी पार पडली व लेडीज कमिटीने घेतलेले श्रावण सरी सुद्धा यशस्वीपणे पार पाडली.

या महिन्यात आपल्या क्लब मार्फत अनेक वेगवेगळे कार्यक्रम राबविण्यात आले. ते सर्व कार्यक्रम हे अविस्मरणीय आहेत. आपल्या कार्यक्रमांची सुरुवात डिस्ट्रीक्ट ॲवार्ड सेरेमनी पासून तर शेवट श्रावण सरी या कार्यक्रमाने झाला. या महिन्यात आपल्या क्लब तर्फे सर्व्हीस प्रोजेक्ट जसे मेडीकल कॅम्प, कॅटॅरॅक्ट, टूथब्रश डिस्ट्रीब्युशन, ब्लड डोनेशन कॅम्प इ.उपक्रम राबविण्यात आले.

**– रो. ॲड. सागर चित्रे**

# ऑगस्ट महिन्यातील साप्ताहिक सभा




**✻ २ ऑगस्ट –** रोजी आयोजित साप्ताहिक सभा ही डिस्ट्रीक्ट अॅवॉर्ड कार्यक्रमाचे नियोजन करण्यासाठी घेण्यात आली होती. आयोजन कमिटी चेअरमन डॉ.प्रदीप जोशी तसेच उपाध्यक्ष रो.आसिफ मेमन यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

**✻ ९ ऑगस्ट –** रोजी आयोजित साप्ताहिक सभेचा विषय होता. 'जीत का जश्न' ४ तारखेला रोटरी क्लब जळगाव तर्फे नियोजनबद्ध केलेले डिस्ट्रीक्ट अॅवार्ड फंक्शन यशस्वीपणे पार पडल्याबद्दल सर्व सहकार्यांचे आभार प्रदर्शित करण्यात आले. तसेच नवीन १० मेंबर आपल्या रोटरी परिवारात सामील करण्यात आले.







**✻ १५ ऑगस्ट –** रोजी आपल्या क्लबचा अमृत महोत्सवी वर्ष साजरा करत असतांना पहिले पब्लीक स्पीच डॉ.आनंद नाडकर्णी यांचे आयोजित करण्यात आले. विषय होता 'सुखी माणसाचा सदरा'' रो.डॉ.क्षमा सुबोध व रो.अन्स् डॉ.सीमा जोशी यांनी त्यांच्याशी संवाद साधला. सदर कार्यक्रम गंधे हॉल येथे आयोजित करण्यात आला होता. वक्त्यांचा परिचय माजी अध्यक्ष रो.डॉ.प्रदीप जोशी यांनी करून दिला तर आभार प्रदर्शन माजी अध्यक्ष रो.डॉ.तुषार फिरके यांनी केले.

**✻ २३ ऑगस्ट** – रोजी आयोजित साप्ताहिक सभेचा विषय होता– 'कुकींग कल आज और कल' वक्ते होते. शेफ निखिल कांडलकर जे सध्या दिल्लीतील ताजमहाल हॉटेल मध्ये शेफ म्हणून कार्यरत आहे. त्यांनी खूप छान मार्गदर्शन करत सांगितले की, भारतीय संस्कृतीचे घरगुती खाद्य पदार्थ आपण ५ स्टार हॉटेल मध्ये खूप पैसे चार्ज करतो. तरी घरच्या चवीनेच आपण तृप्त होते. या कार्यक्रमाचे वक्त्याचा परिचय रो.सुनिल सोनार यांनी केला तर आभार प्रदर्शन रो.आसिफ मेमन यांनी केली.







**✻ ३० ऑगस्ट –** रोजी आयोजित साप्ताहिक सभेचा विषय होता. 'श्रावण सरी' ही सभा लेडीज कमिटी तर्फे आयोजित करण्यात आली होती. सूत्रसंचालन रो.गिरीश कुलकर्णी यांनी केले. या कार्यक्रमात नाविण्यपूर्ण तंबोला आयोजित केला होता. डिस्ट्रीक्ट स्वीमिंग टीम च्या चार सदस्यांचा आपल्या क्लब तर्फे सत्कार करण्यात आला.

# ऑगस्ट महिन्यातील प्रोजेक्टस्

✻ **४ ऑगस्ट –** रोजी अतिशय उत्साहास डिस्ट्रीक्ट अॅवार्ड फंक्शन २३–२४ पार पडले.याचे काही क्षणचित्रे पान नं. ६ वर आहेत.

✻ **१० ऑगस्ट –** रोटरी क्लब जळगाव अंतर्गत शहरातील १४ शाळांमध्ये इंटरॅक्ट क्लब चालविण्यात येतात. यांच्या कार्यकारिणीचा पदग्रहण वर्ष २०२४–२५ साठीच्या १४ इंटरॅक्ट क्लबचा एकत्रितपदग्रहण सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात इंटरॅक्ट क्लबच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व कार्यकारिणी सदस्यांनी पदे स्वीकारली. यात श्रीराम विद्यालय, प. न. लुंकड कन्या शाळा, का. ऊ. कोल्हे विद्यालय, या. दे. पाटील विद्यालय,जिजामाता विद्यालय, भगीरथ हायस्कुल, शकुंतला विद्यालय, संत हरदासराम विद्यालय, ए. टी. झांबरे विद्यालय, नंदिनीबाई वामनराव मुलींचे विद्यालय, आदर्श सिंधी विद्यालय, पी. के. गुळवे विद्यालय, शारदा विद्यालय, बाहेती विद्यालय इ. शाळांचा सहभाग होता. उपस्थित कार्यकारिणी सदस्यांसह विद्यार्थ्यांना वह्यांचे वितरण या कार्यक्रमात करण्यात आले. कार्यक्रमास रोटरी क्लब अध्यक्ष सागर चित्रे, मानद सचिव पराग अग्रवाल व इंटरॅक्ट कमिटी सह–चेअरमन विश्वजित ब–हाटे. सहाय्यक प्रांतपाल रो.जितेंद्र ढाके, डॉ. तुषार फिरके, डॉ. शुभदा कुलकर्णी, स्वाती ढाके, योगेश गांधी, सुभाष अमळनेरकर. मुकेश महाजन, गिरीश कुलकर्णी या रोटरी सदस्यांची उपस्थिती होती.सौ. आरती भंगाळे व श्री.संजय खैरनार या शिक्षक समन्वयकानी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस डॉ. तुषार फिरके यांनी इंटरॅक्ट क्लब स्थापन करण्याचे फायदे सांगितले. तसेच नेतृत्व विकासाची संकल्पना स्पष्ट केली. रो.विश्वजित बऱ्हाटे यांनी सूत्रसंचालन केले. रो.स्वाती ढाके यांनी आभार प्रदर्शन केले.या. दे. पाटील विद्यालयाच्या समन्वयक वर्षा अहिरराव यांनी मागील वर्षीच्या ७x७x७ या प्रकल्पातील व्याख्यानांचे विद्यार्थ्यांनी तयार केलेले हस्तलिखित अध्यक्षांकडे सुपूर्द केले. इंटरॅक्टने वर्षभरात राबवावयाच्या उपक्रमांची माहिती देण्यात आली.




✻ **११ ऑगस्ट –** रोजी रोटरी क्लब जळगावच्या घरातील काम करणाऱ्या स्त्रियांच्या तपासणीचे शिबिर पार पडले. त्यात साधारण ४५ स्त्रियांनी तपासणी केली. यातील सर्व स्त्रियांची रक्त व लघवी तपासणी करून त्यांचे हृदयरोग तज्ञ, स्त्री रोग तज्ञ ऑर्थोपेडिक तज्ञ ,नंतर डायटीशियन, नेत्ररोगतज्ञ,सर्जन या सर्वांकडून तपासणी करून त्यांचे योग्य निदान करून त्यांना सर्व प्रकारचे औषधी पुरवून पुन्हा एक महिन्यानंतर रो. डॉ.जयंत जहागीदार यांना फेर तपासणीसाठी भेटण्यास सांगितले आहे .या कॅम्पला मेडिकल कमिटी चेअरमन रो.डॉ.जयंत जहागीरदार अध्यक्ष रो.अॅड.सागर चित्रे, मानद सचिव पराग अग्रवाल यांनी प्रचंड मेहनत घेतली तसेच रो.रितेश जैन, रो.योगेश गांधी यांनी फेलोशिप मध्ये काम केले व हॉलची तयारी सुद्धा करून घेतली औषध वितरणासाठी औषधी वाटण्यासाठी रो.विजय जोशी यांनी सहकार्य केले त्यांचे सहाय्यक म्हणून रो.नितीन काळुंखे माजी अध्यक्ष रो.राघवेंद्र काबरा तसेच नवीन रो.प्रमोद नारखेडे यांनी मदत केली त्यावेळी मदतीला रो.राजू अडवाणी, माजी अध्यक्ष रो.संदीप शर्मा, रो.अशोक आहूजा रो.आसिफ मेनन, असिस्टंट गव्हर्नर रो. जितेंद्र ढाके नंतर माजी अध्यक्ष रो.पूनम मानूधने मॅडम, रो.विष्णुकांत मणियार, पीपी रो.किशोर मंडोरा, पीपी रो.कॅप्टन कुलकर्णी, रो.रणवीरसिंग कलसी, रो.रवींद्र पाटील यांनी यांची सर्वांची उपस्थिती होती व त्यांचे सहकारी होते कॅम्पचे सर्व सर्वे तो आपले सतत हाकेला उपस्थित असणारे व सहकार्य करणारे रो.डॉ.शशिकांत गाजरे, रो.डॉ.सुनील सूर्यवंशी, रो.डॉ.पराग जहागीरदार, रो.डॉ.तुषार फिरके, डॉ. माधुरी कासट, आहार तज्ञ मधुरा जहागीरदार, डॉ.कृतिका अडवाणी, रो. डॉ. ज्ञानेश पाटील, डॉ. सौरभ सुर्यवंशी, रो.डॉ.पवन बजाज, डॉ. केऊर मेहता व डॉ.पियुष रामलिया, रो.डॉ.हेमंत बाविस्कर या सर्वांनी अतिशय सुंदर पद्धतीने रुग्णांची तपासणी करून निदान करून ट्रीटमेंट दिली. नाव नोंदणी करण्यासाठी अन्य सहकार्य करण्याकरता दीपक चंदनकर, गणेश माळी, शंकर भिकाभाऊ यांनी सहकार्य केले, तसेच को–चेअरमन डॉ.महेश पाटील यांनी सुद्धा फोन द्वारे बऱ्याच स्त्री रुग्णांशी संपर्क साधले.



# ऑगस्ट महिन्यातील प्रोजेक्टस्




*** १२ व २४ ऑगस्ट–** रोजी रोटरी क्लब जळगाव तर्फे अनुक्रमे १२, १७ रूग्णांची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया विष्णुलीला डोळ्यांचे हॉस्पीटल येथे करण्यात आले. रो.डॉ.तुषार फिरके व डॉ.काजल फिरके यांनी सर्व ऑपरेशन केले. तसेच रो.कंवरलालजी संघवी यांनी प्रोजेक्टचे प्रायोजकत्व घेतले आहे. या प्रसंगी रो.डॉ.तुषार फिरके व रो.डॉ.काजल फिरके रो.डॉ.जयंत जहागीरदार व रो.कंवरलालजी संघवी उपस्थित होते.

---

*** १४ ऑगस्ट –** रोजी रक्तदान शिबीर घेण्यात आले. या शिबिराला अध्यक्ष रो.ॲड.सागर चित्रे, मेडीकल कमिटी चेअरमन रो.डॉ.जयंत जहागीरदार, माजी अध्यक्ष रो.जितेंद्र ढाके, चंदन महाजन, योगेश चौधरी हजर होते. हा प्रकल्प राबविण्यासाठी आय.पी.पी. मनोज जोशी यांचे सहकार्य लाभले.




---

*** १५ ऑगस्ट–** रोजी स्वातंत्र्यदिनाचा झेंडावंदनाचा आणि त्यानंतर चा सा रे ग म ग्रुपच्या सौ.स्मिता पाटील, सौ.विशाखा पोतदार, श्री.मुकेश महाजन व पाहुणा कलाकार श्री.सुमीत यांनी खूप छान देशभक्तीपर गीते सादर केली तर झेंडावंदनाच्या कार्यक्रमात एनसीसी बटालियनच्या सध्या भारतीय सेनेत कार्यरत असलेल्या अधिकारी व सैनिकांची व एनसीसी कॅडेटची उपस्थिती असल्याने कार्यक्रमाची शोभा निश्चित वाढली.त्यांचा व इतर रोटरी क्लबचे आलेले काही पदाधिकारी यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. २७ वर्षांच्या खंडानंतर हा एक उत्तम कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याने आपल्या सदस्यांची उपस्थितीही चांगली होती.






---

*** २२ ऑगस्ट–** रोजी रोटरी क्लब जळगावच्या वॉश ॲण्ड विन्स कमिटी तर्फे मुलांच्या निरीक्षणगृहातील विद्यार्थ्यांसाठी ‘स्वच्छता आणि निगा दातांची’ यावर कार्यक्रम झाला. डॉ. पवन बजाज यांनी दातांची निगा या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमानंतर सर्व विद्यार्थ्यांना टूथ पेस्ट व ब्रशचे वाटप करण्यात आले. यावेळी मुलांचे निरीक्षण गृह प्रमुख रविकिरण अहिरराव, मुलींचे निरीक्षण गृह प्रमुख जयश्री पाटील, रोटरी क्लब जळगावचे अध्यक्ष ॲड. सागर चित्रे, मानद सचिव पराग अग्रवाल उपस्थित होते.

# ऑगस्ट महिन्यातील प्रोजेक्टस्



**✻ २२ ऑगस्ट–** नंदिनीबाई वामनराव मुलींचे विद्यालय व जूनियर कॉलेज जळगाव या ठिकाणी ७x७x७ प्रोजेक्ट आणि लिटरसी कमिटी रोटरी क्लब जळगाव, अ. भा. नाट्यपरिषद शाखा जळगाव आयोजित नाट्य कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले . नाट्य कार्यशाळेचे उद्घघाटन अध्यक्ष रो.ॲड.सागर चित्रे. रो.शमा सराफ (अ. भा. नाट्य परिषद जळगाव कोषाध्यक्ष मानद सचिव रो.पराग अग्रवाल, रो.पंकज व्यवहारे (लिटरसी समिती) रो.सुबोध सराफ विद्यालयाच्या प्राचार्य, उपप्राचार्य आणी शिक्षक वृंद उपस्थित होते. नाट्य कार्यशाळेचा समारोपासाठी पी.पी.रो.डॉप्रदीप जोशी उपस्थित राहून त्यांनी सुद्धा विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले .या कार्यक्रमाचे संपूर्ण सूत्रसंचालन कुमारी चिनार कोल्हे या विद्यार्थिनींने केले. तसेच सुबोध सराफ सरांचा परिचय कुमारी मानवी महाजन या विद्यार्थिनीने केला. आभार प्रदर्शन चेतना पाचपांडे या विद्यार्थिनीने केले.

**✻ २५ ऑगस्ट–** रोजी नाशिक क्लब गोदावरी यांनी डिस्ट्रीक्ट मेंबरशिप डेव्हलपमेंट सेमिनार आयोजित केलेला होता. अतिशय नियोजनबद्ध आणि सुंदर असा हा सेमिनार पार पडला. या सेमिनारला आपल्या क्लबमधून एकूण ११ जण उपस्थित होते. दोन चर्चासत्रा मध्ये आपल्या क्लब मधून अध्यक्ष रो.सागर चित्रे आणि माजी मानद सचिव रो.ॲड.हेमंत भंगाळे यांनी 'आर वुई गोईंग रॉंग' व मेंबरशिप ग्रोथ या विषयावर पॅनल चर्चासत्रात सहभाग नोंदविला... या कार्यक्रमात रोटरी क्लब जळगावला मॅक्झिमम पार्टिसिपेशन अवॉर्ड प्राप्त झाला.







**७x७x७ प्रोजेक्ट–** रो.डॉ.पराग जहागीरदार, रो.गिरीश कुलकर्णी, रो.स्वाती ढाके, रो.डॉ.शुभदा कुलकर्णी, रो.डॉ.शमा सराफ, माजी अध्यक्ष रो. कॅप्टन कुलकर्णी, रो.डॉ.प्रज्ञा जंगले, रो.पंकज व्यवहारे यांचे व्याख्यान झाले.






# ॲवार्ड फंक्शन २०२३-२४


























# प्राथमिक शिक्षण आणि साक्षरता

माजी अध्यक्ष रो.कॅ.कुलकर्णी



रोटरी इंटरनॅशनल ने वर्षाच्या बाराही महिन्यांतील प्रत्येक महिन्यासाठी एकेक महत्त्वाचा विषय निवडला आहे. त्यामुळे प्रत्येक क्लबला त्या त्या महिन्यांप्रमाणे आपल्या कार्याचे नियोजन करण्यास एक दिशा मिळते आणि मदत होते. त्याप्रमाणे सप्टेंबर या महिन्याचा विषय आहे. प्राथमिक किंवा मूळ शिक्षण आणि साक्षरता हा विषय रोटरी च्या मुख्य सहा 'फोकस एरिया ' पैकी एक महत्त्वाचा विषय आहे.

आपल्याला माहितच आहे की, एकूण दारिद्र्य जर कमी करायचं असेल, तर समाजातील दुर्लक्षित घटकांचे स्वास्थ्य चांगले ठेवण्यात सुधारणा करायची असेल, किंवा या घटकांची सामाजिक आणि धार्मिक उन्नती साधायची असेल तर प्राथमिक शिक्षण आणि साक्षरता या दोन्ही गोष्टी अतिशय गरजूच्या व महत्त्वाच्या आहेत. समाजातील तेढ व विषमता नष्ट होऊन शांतता प्रस्थापित करण्यासाठी सुद्धा या दोन्ही गोष्टींची नितांत गरज आहे.

खालील गोष्टी आपण लक्षात घेऊया.–

(१) जर सगळ्याच महिला सुशिक्षित झाल्या तर ६६ टक्क्यांनी नवमातांच्या मृत्युचे प्रमाण कमी होईल. (२) लहान मूल जन्मल्यानंतर प्रशिक्षित झाले तर बाल मृत्युंचे प्रमाण ही ५० टक्क्यांनी कमी होईल. (३) कमी उत्पन्न गटातील सर्व विद्यार्थी शाळा सोडायच्या आधी व्यवस्थित प्राथमिक शिक्षण घेऊनच बाहेर पडले तर जगातील एकूण १७ कोटी १० लाख विद्यार्थी हे गरिबीतून बाहेर येतील.


अर्थात आता या सगळ्या गोष्टीत जगात सर्व दूर चांगली प्रगती होत आहे. 'वयस्कर माणसात आणि तरूणांमध्ये साक्षरताचे प्रमाण चांगल्यापैकी वाढते आहे. बरीचशी लहान मुले सुद्धा सुशिक्षित होत असल्याने पूर्वी जे अगदीच निराशाजनक चित्र होते ते जाऊन आशादायी चित्र निर्माण झाले आहे.

मागच्या महिन्यात आपले माजी आर.आय. अध्यक्ष श्री.शेखर मेहता आपल्या क्लबच्या 'इन्स्टॉलेशन' च्या कार्यक्रमास आले असता त्यांनी सांगितले की, आता भारता मध्ये लहान मुलांचे शिक्षण खूप चांगल्या प्रकारे होत असल्याने ती एक समाधानाची बाब आहे. परंतु ॲडल्ट लिटरसी म्हणजे मोठ्या लोकांमध्ये आणि खास करून महिलांमध्ये अजून साक्षरतेचे प्रमाण जेवढे हवे तेवढे नाही त्यामुळे भारत १०० टक्के पूर्व साक्षर झाला असे आपण म्हणू शकत नाही. तर या गोष्टींमध्ये जास्त लक्ष्य देऊन काम करण्याची गरज आहे असे त्यांनी आवाहन केले होते.

आपल्या क्लब मधून आपण आपल्या 'लिटरसी कमिटी', 'इंटररॅक्ट कमिटी' यांच्या माध्यमातून घरोघरी काम करणाऱ्या महिलांसाठी अनेक वेळा प्रशिक्षण वर्ग घेतले आहेत. त्यात त्यांना अक्षर ओळख या बरोबर, बँकेचे व्यवहार आणि थोडी मोबाईल ओळख या विषयाचे सुद्धा ज्ञान दिले आहे. लहान विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळी शालोपयोगी शिबिरे घेऊन प्रोजेक्टस् करणे, वेगवेगळ्या विषयांवर आपल्या क्लबच्या सदस्यांकडून त्यांना मार्गदर्शन करणे, त्यांची वैद्यकीय तपासणी करणे इ. विषयांमुळे तसेच अनेक शाळांना वह्या, पुस्तके यांचे वाटप करणे, इत्यादी लर्निंग साठी कॉम्प्युटर स्क्रीन वाटप करणे, अभिवाचन, संवाद कौशल्य यावर मार्गदर्शन करणे यामुळे विद्यार्थ्यांची एकूणच प्रगती चांगली सक्षम होण्यास मदत होते. समाजात सुद्धा एक प्रकारचा सकारात्मक संदेश जातो जो तितकाच महत्त्वाचा घटक आहे. आपल्या क्लबने अनेक शाळांमध्ये १० वी नंतर विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी काय काय संधी उपलब्ध आहेत. यासाठी मार्गदर्शन शिबिरे घेतली आहेत. विद्यार्थ्यांचे करिअर काऊन्सीलींग सुद्धा घेतले आहेत.बेसीक एज्युकेशन ॲन्ड लिटरसी हा एक मोठा सामाजिक प्रश्न असून त्यात रोटरी अतिशय प्रामाणिकरित्या हा प्रश्न सोडवण्यासाठी मदत करीत आहे. आणि आपला क्लब सुद्धा गेल्या अनेक वर्षांपासून यात अथक प्रयत्न करीत असून प्रगतीसाठी हातभार लावीत आहे.

# तेथे कर माझे जुळती

माजी अध्यक्ष रो.प्रेम कोगटा





रो.माजी अध्यक्ष डॉ .सुभाष चौधरी हे आपल्या क्लब मधील अतिशय महत्त्वाचे आणि विशेष असे व्यक्तिमत्व होते .त्यांच्या उमेदीच्या काळात म्हणजेच डॉक्टर म्हणून ते खूप यशस्वी झाले होते, तेव्हा सतत कामात व्यस्त असूनही, त्यांनी रोटरी क्लबच्या अध्यक्षपदाची धुरा यशस्वीपणे सांभाळली .आपल्या क्लबच्या गोल्डन जुबली वर्षाचे ते यशस्वी अध्यक्ष होते .त्यांनी सर्व रोटेरियन्स समोर एक आदर्श निर्माण केला. आजच्या रोटेरियन्स साठी ते एक उत्तम उदाहरण होते. सर्वांनीच त्यांच्याकडून बोध घ्यावयास हवा. आपल्या दैनंदिन जीवनात आपण कितीही व्यस्त असलो तरी, रोटरी कार्यासाठी वेळ काढू शकतो. डॉ. सुभाष चौधरी यांच्यासारखा अत्यंत व्यस्त २४X७ रुग्णसेवेत कार्यमग्न असणारा व्यक्ती जर रोटरी कार्यासाठी वेळ काढू शकतो ,तर आपण नक्कीच काढू शकतो .त्यांच्या अध्यक्षीय कार्यकाळास रोटरी क्लब जळगावचे अतिशय महत्त्वपूर्ण –उत्तम वर्ष म्हणता येईल. त्यांना बेस्ट प्रेसिडेंट अवॉर्ड सुद्धा प्राप्त झालेला होता .क्लब मध्ये डॉक्टरांनी अशी परंपरा निर्माण केली की , जे सीनियर डॉक्टर अद्याप अध्यक्ष व्हायला तयार नव्हते त्यांनी डॉ सुभाष चौधरी यांना यशस्वीपणे अध्यक्ष झालेले पाहून पुढे आले व स्वतःहून अध्यक्ष झाले . डॉ सुभाष चौधरी हे अनेक कॉन्फरन्स, सेमिनार ला आवर्जून सर्वांसोबत उपस्थित राहायचे व तितक्याच इंटरेस्ट घेऊन ते त्यात सहभागी ही व्हायचे. त्याचे अतिशय वेगळे व्यक्तिमत्व होते. शहरातील इतके नावाजलेले प्रतिष्ठीत डॉक्टर होते तरी पण, रोटरीतील त्यांचा सहभाग हा अत्यंत प्रेरणादायी होता. क्लबच्या साप्ताहिक सभा असो किंवा प्रोजेक्ट असो ,त्यांची उपस्थिती ही असायचीच. रोटरीच्या कोणत्याही प्रोजेक्टसाठी ते तत्परतेने मदत करावयास तयार असायचे. विशेषतः मेडिकल कॅम्प साठी सगळ्या प्रकारची मेडिकलची मदत करणे .हे काम डॉक्टरांनी अनेक वर्ष आपल्या क्लब साठी केले . मितभाषी, सर्वांशी चांगले संबंध असणारे व नेहमी सर्वांना मदतीचा हात पुढे करणारे डॉ सुभाष चौधरी आज आपल्यात नाही .त्यांची उणीव आपल्याला सतत जाणवत राहील .रोटरी क्लब जळगाव तर्फे त्यांना आपण सर्वजण आदरपूर्वक श्रद्धांजली वाहू या.

# इतिहासातील सुवर्ण पान

माजी अध्यक्ष रो.राजाभाऊ देशपांडे



१९ ७३– ७४ साली आपल्या रोटरी क्लब जळगावला माननीय राजाभाऊ देशपांडे हे अध्यक्ष म्हणून लाभले. त्यांनी १९६६ साली रोटरीत प्रवेश केला होता. राजाभाऊ हे ५५ वर्ष आपल्या क्लब मध्ये रमले. १९७३– ७४ या वर्षी वयाच्या ३६व्या वर्षी ते क्लब मध्ये अध्यक्ष म्हणून निवडून आले. आणि त्यामुळे क्लब मध्ये वर्षभर खूप उत्साहाचे वातावरण होते . वर्षभरात त्यांनी रोगनिदान शिबिर, पोलिओ संबंधित प्रतिबंधक लस देणे, धनुर्वात, डांग्या, खोकला आणि घटसर्प प्रतिबंधक लस देणे आणि यासारखी अनेक प्रोजेक्ट त्यांनी आपल्या कार्यकाळात घेतली. शालेय मुलांकरता संस्कार शिबिर हा दोन दिवसाचा अनोखा प्रोजेक्ट घेतला. या कार्यक्रमाची खूप प्रशंसा झाली. सभासदांनी रोटरी संबंधीची आस्था वाढवून साप्ताहिक सभेस हजेरी व प्रोजेक्ट मधला सहभाग वाढावा, म्हणून यांच्या कार्यकाळात ठोस पावले उचलण्यात आली. मराठीत छोट्या नाटिका लिहिल्या व त्या सभासदांनी सहभाग घेऊन साप्ताहिक मीटिंगमध्ये सादर केल्या. त्यावर्षीची डिस्ट्रिक्ट कॉन्फरन्स ही आपल्या क्लबच्या सभासदांनी गाजवली. रोटेरियंस व त्यांच्या पत्नी असे मिळून ४० जण उपस्थित होते. आपल्या क्लब तर्फे 'असावा नसावा' हे गीत तेथे सादर करण्यात आले. यात रोटरी सभासद, सेक्रेटरी, प्रेसिडेंट, गव्हर्नर इ. मंडळी कशी असावी किंवा नसावी यासंबंधी व्यंग काव्य होते. आपल्याला पूर्ण डिस्ट्रिक्ट मध्ये त्याचे कौतुक झाले. सर्वांना ते खूप आवडले. त्यांच्या ५५ वर्षाच्या रोटरीच्या प्रवासात पाच–सहा वर्ष सोडले तर त्यांचा सक्रीय असा सहभाग होता.

# जीवेत् शरदः शतम्...!

| | | |
|---|---|---|
| १) | ८ सप्टेंबर | रो. चंदन वासुदेव महाजन |
| २) | १० सप्टेंबर | रो. त्रिभुवन शहा |
| ३) | १० सप्टेंबर | रो. रितेश जैन |
| ४) | १५ सप्टेंबर | रो. पराग जहागिरदार |
| ५) | १५ सप्टेंबर | रो. कंवरलाल संघवी |
| ६) | १८ सप्टेंबर | पीपी रो. संदीप शर्मा |
| ७) | १९ सप्टेंबर | रो. डॉ. रोहन बोरोले |
| ८) | २४ सप्टेंबर | पीपी रो. पुनम मानुधने |
| ९) | २५ सप्टेंबर | रो. राजेश यावलकर |
| १०) | २६ सप्टेंबर | रो. नारायण लाठी |
| ११) | २९ सप्टेंबर | पीपी रो. डॉ. दिपक पाटील |

## सप्टेंबर महिन्यातील कॅप्टन

सदर कॅप्टन यांनी सप्टेंबर महिन्यात क्लबच्या सर्व कमिटी चेअरमन यांचेशी समन्वय साधून त्यांच्या कामात मदत करणे.



माजी अध्यक्ष रो.प्रदीप जोशी



रो.श्याम अग्रवाल

## अभिनंदन!

* पी.पी.रो.डॉ.तुषार फिरके यांचे रो.वर्ष २०२५-२६ साठी डिस्ट्रीक्ट सेक्रेटरी ओ.सी.व्ही. पदी नियुक्ती करण्यात आली आहे.
* ए.जी.रो. जितेंद्र ढाके यांची प्रेसिडेंट इनक्लेव्ह चेअर २०२५-२६ साठी निवड करण्यात आली.
* रो.किरण बेंडाळे यांना रोटरी क्लब स्टार तर्फे 'रोटरी का गौरव पुरस्कार' स्व.डॉ.प्रताप जाधव यांच्या स्मरणार्थ देण्यात आला.
* रो. योगेश चौधरी हे लोखंड हार्डवेअर असोसिएशनचे अध्यक्षपदी नियुक्ती झाली.
* रो.चंदन महाजन यांची लोखंड हार्डवेअर असोसिएशनच्या मा.सचिव पदी नियुक्ती झाली.
* रो.निलेश झोपे यांचे भारतीय जनता पार्टी जळगाव महानगर जिल्हा कार्यकारिणीत जिल्हाध्यक्ष पदी निवड झाली आहे.
* निर्वाचित अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी यांनी लर्निंग सेंटर मधील दोन कोर्स यशस्वीरित्या पूर्ण केले.
* रो. पंकज व्यवहारे यांनी इंटरनॅशनल स्टडीज् मध्ये सर्टिफाईट करियर काऊंसिलींग कोर्स केला.
* रो.डॉ.प्रदीप जोशी, रो.डॉ.हेमंत बाविस्कर, रो.डॉ.सागर जावळे तसेच रो.दिपक चांदोरकर यांना सुर्यदत्ता एक्सलॅन्स ॲवार्ड २०२४ ने सन्मानित करण्यात आले.
* रो.डॉ.सतिश शिंदाडकर यांचे सुपुत्र डॉ.समीर शिंदाडकर याने डॉ.ऑफ मेडिसीन ही पदवी ए.एम.ए. स्कूल ऑफ मेडिसीन, मनीला येथून संपादन केली.

## * श्रद्धांजली *

माजी अध्यक्ष रो.डॉ.सुभाष चौधरी यांचे दु:खद निधन झाले.

